महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ 29 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 271 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# गडकरी , फडणवीस,पवार देशातल्या प्रभावी लोकांच्या यादीत



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

इंडियन एक्स्प्रेसने भारतातल्या १०० प्रभावी लोकांची यादी जाहीर केली आहे. यामध्ये अर्थातच नरेंद्र मोदी, गौतम अदाणी यांची नावं आहेत. शिवाय महाराष्ट्रातली नावंही आहेतच. पण एकही ठाकरे या यादीत नाहीत. नरेंद्र मोदींनी सलग तिसऱ्यांदा यश मिळवल्यानं भाजपाचं महत्त्व देशभरात वाढलं नरेंद्र मोदी यांनी एनडीएसह लोकसभा निवडणुकीत विजयाचा झेंडा पुन्हा एकदा फडकवला आहे. अर्थात २०२४ ची लोकसभा निवडणूक ४०० पार वगैरे नेणारी नव्हती. इंडिया आघाडीने भाजपा आणि एनडीएला तगडी टक्कर दिली यात काहीच शंका नाही. तसंच भाजपासह महायुतीला महाराष्ट्रातही तगडं बहुमत मिळालं. यानंतर देशातल्या राजकारणात, समाजकारणात अनेक गोष्टी, घडामोडी बदलल्या. दरम्यान देशातल्या १०० प्रभावी लोकांची यादी इंडियन एक्स्प्रेसने तयार केली आहे. या यादीत महाराष्ट्रातल्या किती जणांचं स्थान आहे? आपण जाणून घेऊ. ही यादी फक्त राजकारण्यांची आहे का? तर तसंही नाही. देशभरात चर्चेत राहिलेल्या प्रभावी लोकांची ही यादी आहे. यामध्ये गौतम अदाणी, योगी आदित्यनाथ, राहुल गांधी ही नावंही आहेतच. राजकारणी आणि व्यावसायिक यांच्यासह १०० प्रभावशाली व्यक्तींचीही ही यादी आहे.

### १०० प्रभावशाली व्यक्तींच्या यादीत महाराष्ट्रातली किती नावं?

मोहन भागवत, नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, पियूष गोयल, अजित पवार, शरद पवार हीच नावं आहेत. १२ व्या क्रमांकावर पियूष गोयल, १३ व्या क्रमांकावर देवेंद्र फडणवीस, १५ व्या क्रमांकावर नितीन गडकरी, ५१ व्या क्रमांकावर एकनाथ शिंदे, ५७ व्या क्रमांकावर अजित पवार आहेत. तर शरद पवार ७७ व्या क्रमांकावर आहेत. महाराष्ट्रातली सात नावं या यादीत आहेत. विशेष बाब म्हणजे राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंपैकी एकही नाव या यादीत नाही. अमिताभ बच्चन, आलिया भट्ट, करण जोहर, शाहरुख खान या सेलिब्रिटींचीही नावं आहेत.

१) नरेंद्र मोदी
२) अमित शाह
३) एस. जयशंकर
४) मोहन भागवत
५) निर्मला सीतारमण
६) योगी आदित्यनाथ
७) राजनाथ सिंह
८) अश्विनी वैष्णव
९) राहुल गांधी
१०) मुकेश अंबानी
११) गौतम अदाणी
१२) पियूष गोयल
१३) देवेंद्र फडणवीस
१४) एन. चंद्राबाबू नायडू
१५) नितीन गडकरी
१६) संजय मल्होत्रा
१७) भूपेंदर यादव
१८) ममता बॅनर्जी
१९) हरदीप सिंग पुरी
२०) सिद्धरामय्या
२१) नितीश कुमार
२२) धर्मेंद्र प्रधान
२३) एम. के. स्टॅलिन
२४) जय शाह
२५) एन चंद्रशेखरन
२६) नीता अंबानी
२७) जनरल उपेंद्र द्विवेदी
२८) अनुमला रेवंथ रेड्डी
२९) शिवराज सिंह चौहान
३०) नोएल नवल टाटा
३१) हिमंता बिस्वा सरमा
३२) पुष्कर धामी
३३) मल्लिकार्जुन खरगे
३४) मनसुख मांडवीय
३५) अजित डोवल
३६) विश्वनाथन आनंद
३७) उदय कोटक
३८) नायब सिंग सैनी
३९) मनोहर लाल खट्टर
४०) हेमंत सोरेन
४१) पिनरयी विजयन
४२) बीएल संतोष
४३) शक्तिकांता दास
४४) भगवंत मान
४५) संजीव खन्ना
४६) ओमर अब्दुल्ला
४७) दीपेंदर गोयल
४८) रोहीत शर्मा
४९) राजीव बजाज
५०) जे. पी. नड्डा
५१) एकनाथ शिंदे
५२) अरविंद केजरीवाल
५३) तुषार मेहता
५४) राजीव रंजन
५५) सरबंडाना सोनवाल
५६) ज्योतिरादित्य सिंधिया
५७) अजित पवार
५८) किरण रिजेजू
५९) चिराग पासवान
६०) सी. आर. पाटील
६१) प्रेमा खंडू
६२) विष्णू देव साई
६३) प्रमोद सावंत
६४) भूपेंद्र पटेल
६५) रेखा गुप्ता
६६) मोहन यादव
६७) भजनलाल शर्मा
६८) सुनील भारती मित्तल
६९) प्रताप सी रेड्डी
७०) अरविंद श्रीनिवास
७१) अजय कुमार भल्ला
७२) विराट कोहली
७३) कोनिडेला पवन कल्याण
७४) विजय
७५) टीव्ही सोमनाथन
७६) निखिल कामथ
७७) शरद पवार
७८) पी. के. शर्मा
७९) मनोज सिन्हा
८०) किरण नाडार
८१) प्रियांका गांधी वाड्रा
८२) शशी थरुर
८३) जसपित बुमराह
८४) तुहीन कांता पाडे
८५) डी. के. शिवकुमार
८६) तेजस्वी यादव
८७) अखिलेश यादव
८८) गजेंद्र सिंग शेखावत
८९) असदुद्दीन ओवैसी
९०) एच. डी. कुमारस्वामी
९१) कुमार मंगलम बिर्ला
९२) अल्लू अर्जुन
९३) रामदेव
९४) सुखविंदर सिंग सुखू
९५) व्ही. नारायणन
९६) करण जोहर
९७) शाहरुख खान
९८) दिलजीत दोसांज
९९) अमिताभ बच्चन
१००) आलिया भट्ट

## पंतप्रधान मोदी गुढीपाडव्याला महाराष्ट्र दौऱ्यावर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

पंतप्रधान नरेंद्र मोदी 30 मार्चला महाराष्ट्र दौऱ्यावर येणार असून, नागपुरातील विविध महत्त्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत. मोदी यांच्या हस्ते सोलार डिफेन्स आणि एअरोस्पेस लिमिटेड येथे संरक्षण क्षेत्रातील अत्याधुनिक प्रकल्पांचे उद्घाटन होणार आहे. यामध्ये अनमॅन्ड एरियल व्हेईकल्ससाठी 1250 मीटर लांबीची विशेष धावपट्टी आणि लोइटरिंग म्युनिशन चाचणीसाठी अत्याधुनिक सुविधा राष्ट्राला समर्पित केली जाणार आहे. तसंच नागपुरातील माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरच्या विस्तार प्रकल्पाची पायाभरणीही पंतप्रधानांच्या उपस्थितीत केली जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत 250 खाटांचे रुग्णालय, 14 बाह्यरुग्ण विभाग आणि अत्याधुनिक 14 ऑपरेशन थिएटर उभारण्यात येणार आहेत. पंतप्रधान मोदी दीक्षाभूमी येथे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. तसंत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'प्रतिपदा' कार्यक्रमानिमित्त स्मृती मंदिराला पंतप्रधान मोदी भेट देऊन संघ संस्थापकांना अभिवादन करतील.

### थोडक्यात महत्वाचे

## जीवनदीप महाविद्यालयात भव्य आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**टिटवाळा :** जीवनदीप शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून नेहमीच अनेक शिबिरांचे आयोजन केले जाते तसेच संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांच्या माध्यमातून अनेक समाज कल्याणकारी कार्य करण्यात येते. आज दिनांक 28 मार्च 2025 रोजी जीवनदीप महाविद्यालय गोवेली येथे भव्य मोफत आरोग्य तपासणी शिबिराचा आयोजन करण्यात आलं होतं. ग्रामीण भागातल्या लोकांना मोफत उपचार मिळावेत तसेच आर्थिक स्थित्या दुर्बल असणारा लोकांना अनेकदा उपचार करण्यास अडचणी उपलब्ध होतात आणि त्यांना वेळेत उपचार करता येत नाहीत त्यामुळे अनेकदा ते आजारांकडे दुर्लक्ष करतात आणि अशा अनेक समस्याग्रस्त लोकांचे निदान होण्यासाठी च्या हेतूने या आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलं होतं. यावेळेस रुग्णांना योग्य उपचार देण्यासाठी विशेष तज्ञ डॉक्टरांची उपस्थिती होती त्यामध्ये MS Ortho spine specialist डॉ. प्रतीक भुजबळ,MS ORTHO अस्थिरोग तज्ञ डॉ.ऋषिकेश पाटील,M.D.आयुर्वेदिक पंचकर्म डॉ प्रतीक्षा घोडविंदे तसेच डॉ रिद्धी आव्हाड हे तज्ञ डॉक्टर सहभागी होते. या शिबिरासाठी भाजपा प्रदेश सचिव भरत पाटील, भाजपा सरचिटणीस रामवायजी पाटील उपस्थित होते त्यांनी त्यांच्या मनोगतातून वेळेत आजाराचा निदान होण्यासाठी जास्तीत जास्त नागरिकांना या शिबिरामध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार प्रदर्शन प्रा.सतीश लकडे यांनी केले,या कार्यक्रमास राष्ट्रीय सेवा योजना विभाग,DLLE,WDC विभाग यांचे विशेष सहकार्य लाभले यावेळे २०० हून अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला.यावेळेस जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे ,वृंदावन सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटलचे डायरेक्टर डॉ राजा झा, डॉ. भुजबळ यांची संपूर्ण टीम, गोवेली ग्रामीण सरपंच दीपक जाधव, सामाजिक कार्यकर्ते राजेंद्र पोतदार ,सरचिटणीस कल्याण नेताजी भोईर, सौ . स्मिता घोडविंदे जीवनदीप महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ के बी कोरे,उपप्राचार्य हरेंद्र सोष्टे, सर्व प्राध्यापक प्राध्यापिका कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला.

## ठाणे ग्रामीण पोलिसांनी हाती घेतला आपले ग्रामीण पोलीस' उपक्रम

### ठाणे ग्रामीण पोलिसांनी हाती घेतला आपले पोलीस, ठाणे ग्रामीण पोलीस' उपक्रम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ग्रामीण भागात पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी अनेकदा तक्रारदाराला कैक मैल अंतर पार करून पोलीस ठाणे गाठावे लागते. अनेकदा गुन्हा दाखल होतो असे होत नाही. त्यामुळे तक्रारदाराला हताश होऊन पुन्हा गावाकडे परतावे लागते. त्या तक्रारदाराचा संपूर्ण दिवस या प्रक्रियेत वाया जातो. त्यामुळे ठाणे ग्रामीण पोलिसांनी आता 'आपले पोलीस, ठाणे ग्रामीण पोलीस' हा उपक्रम राबविला आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून एक वाहन तयार करण्यात आले आहे. हे वाहन गाव-पाड्यात जाऊन तेथे कायद्याविषयी जनजागृती करणार असून एखाद्या व्यक्तीला तक्रार द्यायची असल्यास त्या व्यक्तीला थेट या वाहनातील पोलीस अधिकाऱ्यांमार्फत तक्रार दाखल करता येणार आहे. या उपक्रमामुळे गाव पाड्यात राहणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

> नागरिकांवर होणाऱ्या अन्यायविरोधात तक्रार देण्यासाठी नागरिकांनी पुढे यावे यासाठी हा उपक्रम आहे. या वाहनामध्ये साहाय्यक पोलीस उपनिरीक्षक, दोन महिला अंलदार आणि दोन पुरूष अंमलदार असणार आहे. तसेच या वाहनाच्या माध्यमातून महिला, बालक सुरक्षितता, भारतीय न्याय सहिताच्या कलमांची माहिती, गुन्हेगारी रोखण्यासाठी उपाययोजनांबाबतची जनजागृती केली जाणार आहे.
>
> – डॉ. डी.एस. स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण पोलीस.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेनुसार, सात कलमी कार्यक्रमांतर्गत ठाणे ग्रामीण पोलिसांनी आता 'आपले पोलीस, ठाणे ग्रामीण पोलीस' हा उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत ग्रामीण पोलिसांनी एक वाहन तयार केले आहे. हे वाहन पोलीस ठाण्यापासून लांब असलेल्या प्रत्येक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गाव पाडे, दुर्गम भागात फिरणार आहे. या वाहनामध्ये तक्रारी नोंदविण्यासाठी कक्ष तयार करण्यात आला आहे.

एखाद्या व्यक्तीला काही तक्रार द्यायची असल्यास तो व्यक्ती तेथे जाऊन तक्रार देऊ शकतो. तसेच भारतीय न्याय संहिताच्या कलमांबद्दल माहिती देखील या वाहनातून दिली जाणार आहे. यासह बाल लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी किंवा असा प्रकार घडल्यास त्याबाबतचे कलम कोणते याचीही माहिती दिली जाणार आहे.ग्रामीण क्षेत्रात बाल विवाहाचे प्रमाण अधिक आहे. हे प्रमाण रोखणे, पोलीस मदत क्रमांक, सायबर फसवणूक रोखण्यासाठी उपाय, अमली पदार्थविरोधात जनजागृती अशा विविध प्रकरणात जनजागृती करण्यासाठी या वाहनावर एक एलईडी स्क्रिन बसविण्यात आली आहे. त्या स्क्रिनवर याबाबतची माहिती दिली जाणार आहे.

**ठाणे जिल्ह्यात ठाणे ग्रामीण पोलिसांच्या क्षेत्रात भिवंडी तालुका, गणेशपुरी, पडघा, कल्याण तालुका, कसारा, किन्हवली, कुळगाव, मुरबाड, शहापूर, टोकवडे आणि वाशिंद पोलीस ठाणे येतात. यातील अनेक पोलीस ठाण्याच्या हद्दी मोठ्या आहेत. अनेक गाव पाडे पोलीस ठाण्यापासून पाच किलोमीटरहून अधिक अंतरावर आहे. त्यामुळे एखादा गुन्हा घडल्यास त्याबाबत तक्रार देण्यासाठी संबंधित तक्रारदाराला पोलीस ठाणे गाठणे खर्चिक ठरते. तसेच, काही महत्त्वाच्या कामासाठी देखील नागरिक पोलीस ठाण्यात जात असतात. पोलीस ठाणे जास्त अंतरावर असल्याने आदिवासी पाड्यांमध्ये राहणाऱ्यांना याचा सर्वाधिक फटका बसतो.**

### जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून

## मुरबाड तालुक्यातील विकास कामांची पाहणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी मुरबाड तालुक्यातील विविध ठिकाणी कामांची पाहणी करून दिली भेट!मुरबाड दि.२८(बाळासाहेब भालेराव )ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी बुधवारी मुरबाड तालुक्यातील विविध भागात दौरा करून विविध कामांची पाहणी करून ठिकठिकाणी कामांना दिल्या भेटी तसेच मुरबाड नगरपंचायत कामांचा आढावा घेतला त्यावेळी मुरबाड नगरपंचायतीचे मुख्याधिकारी मनोज म्हसे यांच्यासह सर्व अधिकारी टीम उपस्थित होती.तसेच ग्रामपंचायत विढे येथे जलजीवन योजना अंतर्गत नळ पाणीपुरवठा योजनाच्या कामाची पाहणी व आढावा घेण्यासाठी ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी सन्माननीय अशोक शिंनगारे व ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी भेट देऊन मार्गदर्शन केले.

जल जीवन योजना अन्वये गावामध्ये हरघर जल ही योजना यशस्वीपणे कार्यान्वित झाल्याने सदर योजनेबाबत ठाणे जिल्हाधिकारी व ठाणे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समाधान व्यक्त केले. व योजना अशीच सुरळीत कार्यान्वित राहावी म्हणून सूचना दिल्या. त्यांचे समवेत कल्याण प्रांतअधिकारी विश्वास गुजर, मुरबाड तहसीलदार अभिजीत देशमुख गटविकास अधिकारी लता गायकवाड, पंचायत समिती पाणी पुरवठा विभागाचे उप अभियंता



जगदीश बनकरी व पाणीपुरवठा खात्याचे अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी त्यांचा मुरबाड तालुका कृषी उत्पन्न बाजार समिती चेअरमन बाळकृष्ण चौधरी व सरपंच रमा चौधरी यांच्या हस्ते स्वागत करण्यात आले. यावेळी गजानन चौधरी, उपसरपंच रोहिदास चौधरी, ग्रामपंचायत अधिकारी सचिन घुडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



## शहापूरातील शेणवा आरोग्य केंद्रास अकस्मित भेट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शासनाच्या 'मिशन 100 डेज्' अंतर्गत जिल्हाधिकारी अशोक शिनगारे व मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी शहापूर तालुक्यातील शेणवा प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट देवून तेथील उपलब्ध औषधसाठा, स्वच्छता तसेच इतर सोयीसुविधांची पाहणी केली. यावेळी त्यांनी नागरिकांना मिळणाऱ्या आरोग्य सोयीसुविधांची खातरजमा करण्यासाठी उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून स्वतःची वैद्यकीय तपासणी करून घेतली. यावेळी त्यांनी आपली ईसीजी चाचणी केली. या चाचणीचा रिपोर्ट अवघ्या 3 मिनिटात प्राप्त झाला. या घटनेमुळे प्रशासनातर्फे देण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांच्या तत्परतेबद्दल तेथील नागरिकांनी आरोग्य विभागाचे आणि जिल्ह्याच्या सर्वोच्च अधिकाऱ्यांनी अशा प्रकारे दिलेल्या अचानक भेटीचे कौतुक केले. याप्रसंगी उपस्थित आरोग्य अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रोत्साहनपर मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, आपल्या हातून जनतेची सेवा घडत राहावी. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत आपल्या आरोग्य सोयीसुविधांचा लाभ मिळायला हवा. यासाठी सर्वांनी एकजुटीने व प्रामाणिकपणे आपली कर्तव्यपूर्ती करावी. या भेटीप्रसंगी शहापूर तहसिलदार परमेश्वर कासुले, शेणवा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.




## आता बदलापुरात ई-कार्यालय प्रणाली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : पालिकेतून दस्त गहाळ होणे, वेळीच उपलब्ध न होणे, कर्मचारी किंवा अधिकारी जागेवर नसणे अशा कामकाजातील दिरंगाईची कारणे आता बंद होणार आहेत. कुळगाव बदलापूर नगरपालिकेने कामाकजातील सुसुत्रतेसाठी १०० टक्के ई कार्यालय प्रणाली राबवली आहे. त्यामुळे दस्तऐवजांचा मागोवा घेणे सोपे होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून हे काम प्रायोगित तत्वावर सुरू होते. आता एका क्लिकवर सर्व कागदपत्रे उपलब्ध होणार आहेत.

१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम सध्या सुरू आहे. त्याअंतर्गत कुळगांव बदलापूर नगर पालिकेने ई-कार्यालयाची १०० टक्के अंमलबजावणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. पालिकेने पारंपरिक कागदी प्रणालीला पर्याय म्हणून "ई- कार्यालय" हा नवा डिजिटल मार्ग अवलंबला आहे. या उपक्रमामुळे नगरपालिका प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि डिजिटल बनण्यास मदत होणार आहे.

शासनाच्या कामकाजात सुधारणा आणण्यासाठी तसेच नागरिकांना अधिक प्रभावी आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी हा उपक्रम सुरु करण्यात आला आहे. या ई कार्यालय प्रणालीमुळे फाईलींचे वहनही वेगाने होण्याची आशआ आहे. तसेच कागदी कामकाजावर अवलंबून राहण्याची आवश्यकता संपली आहे, अशी माहिती कुळगाव बदलापूर नगरपालिकेचे मुख्याधिकारी मारूती गायकवाड यांनी दिली आहे.

विविध विभागांमधील दस्तऐवज व माहिती आता ऑनलाइन व्यवस्थापित केली जात आहे, ज्यामुळे कार्यप्रवाह अधिक कार्यक्षम आणि पारदर्शक झाला आहे. दस्तऐवज गहाळ होणे, दस्तऐवज उपलब्ध नसणे, अधिकारी कर्मचारी जागेवर नसताना फाईल न सापडणे, ठेकेदार किंवा अधिकारी, कर्मचारी यांच्या बदलीनंतर ती फाईल शोधण्यास विलंब लागणे अशा सर्व समस्यांवर आता ई कार्यालय प्रणाली फायदेशीर ठरण्याची आशा आहे. सर्व कागदपत्रांचा मागोवा घेणे सोपे झाले असून एका क्लीकवर हवे असलेले दस्तावेज उपलब्ध होणार आहेत. तसेच हे सर्व दस्तावेज सुरक्षित साठवले जाणार आहेत.

कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

सर्व कर्मचाऱ्यांचे शासकीय मेल आयडी कार्यान्वयित करून प्रत्येकाचे स्वतंत्र अकाऊंट तयार करण्यात आले आहेत. ई-ऑफिस सर्व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली आहे. नागरिकांना कमी वेळात अधिकाधिक सेवा जलद गतीने देणे शक्य होणार आहे, असे मुख्याधिकारी मारुती गायकवाड यांनी सांगितले आहे



# गीतासार



अध्याय ६
## आत्मसंयमयोगः

योगी युञ्जीत सततमात्मानं रहसि स्थितः । एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ ६-१० ॥

मन व इंद्रिय यांसह शरीर ताब्यात ठेवणाऱ्या निरिच्छ आणि संग्रह न करणाऱ्या योग्याने एकट्यानेच एकांतात बसून आत्म्याला नेहमी परमात्म्यात लावावे. ॥ ६-१० ॥

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः । नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ६-११ ॥

शुद्ध जमिनीवर क्रमाने दर्भ, मृगाजिन आणि वस्त्र अंथरून तयार केलेले, जे फार उंच नाही व जे फार सखल नाही, असे आपले आसन स्थिर मांडून ॥ ६-११ ॥

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेन्द्रियक्रियः । उपविश्यासने युञ्ज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ ६-१२ ॥

त्या आसनावर बसून चित्त व इंद्रिय यांच्या क्रिया ताब्यात ठेवून मन एकाग्र करून अंतःकरणाच्या शुद्धीसाठी योगाभ्यास करावा. ॥ ६-१२ ॥

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः । सम्प्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ ६-१३ ॥

शरीर, डोके आणि मान सरळ रेषेत अचल ठेवून स्थिर व्हावे. आपल्या नाकाच्या शेंड्यावर दृष्टी ठेवून अन्य दिशांकडे न पाहता ॥ ६-१३ ॥

# रेसिपी
## काकडी पुदिन्याचे ताक



उन्हाळा सुरु झाला की, आपल्या डिहायड्रेशनचा त्रास होतो. शरीरातील पाण्याची पातळी कमी होते.शरीराला हायड्रेट ठेवण्यासाठी आपण भरपूर प्रमाणात पाणी पितो. परंतु शरीराला फक्त पाण्याची आवश्यकता नसते. उन्हाळ्यात शरीराला विविध पेय, ज्यूस किंवा सरबतांची आवश्यकता असते. या काळात आपण अधिक रसाळ आणि पाणीदार फळे देखील खातो. शरीर हायड्रेट ठेवण्यासाठी ऊसाचा रस, नारळ पाणी, मोसंबीचा ज्यूस या सारखे पेय प्यायले जाते.आपल्याकडे जेवल्यानंतर अनेकांना ताक पिण्याची सवय आहे. ताक हे शरीरासाठी फायदेशीर असते. पण बरेचदा दही किंवा दह्याचे पदार्थ खाल्याने आपल्याला त्रास होतो. सर्दी-खोकल्यासारखे सामान्य आजार उद्भवतात. ताक प्यायल्याने पचनसंस्था सुरळीत होते. तसेच यातून शरीराला अनेक पोषकतत्व मिळतात.

**साहित्य :**

दही - १ कप काकडी- १ पुदिन्याची पाने - १० ते १२ कोथिंबीर काळे मीठ - चवीनुसार चाट मसाला - चवीनुसार जिरे पावडर - आवश्यकतेनुसार

**कृती :**

1. सगळयात आधी मिक्सरच्या भांड्यात काकडीचे तुकडे, पुदिन्याची पाने, कोथिंबीर, काळे मीठ, चाट मसाला आणि जिरे पावडर घालून वाटून घ्या. 2. आता एका बाऊलमध्ये दही चांगले फेटून घ्या. त्यात थोडे पाणी घालून पुन्हा चांगले फेटा. 3. यामध्ये तयार मसाला घालून चांगले ढवळून घ्या. काकडी-पुदिन्याचे ताक जेवल्यानंतर प्या.

# १५० वर्षापूर्वीच्या वाड्याला आग





## ऐतिहासिक वाडा नामशेष !


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड :** मुरबाड तालुक्यातील नेवाळपाडा गावात असणाऱ्या चांदणी चौक वाडा हा ऐतिहासिक वाडा प्राचीन असून या वाड्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज, पंतप्रधान अन्य मान्यवर येथे भेट देऊन गेली आहेत या वाड्यामधून अनेक कारभार न्याय निवाडे जनतेचे प्रश्न सोडवले जायचे या वाड्यात अनेक ऐतिहासिक साहित्य शिवकालीन माहिती या वाड्यात जवळपास ३०० खोल्या अनेक भुयारी मार्ग तसेच धान्य कोठारे घोडदळ प्राचीन शिवमंदिर असे अनेक गोष्टी या वाड्यामध्ये होत्या . या वाड्याला शुक्रवारी दुपारी दीड वाजण्याच्या दरम्यान अचानक लागलेल्या आगीत ऐतिहासिक वाडा जळन खाक झाला आहे या वाड्यामध्ये असणारी जुनी भांडी सुद्धा मोठ्या प्रमाणात जळाली आहेत या घटनेची माहिती मिळताच मुरबाडच्या दोन अग्निशामक दलाच्या गाड्या पोहोचल्या त्यावेळी काही प्रमाणात आग विझवण्यात अग्नीक्षमक दलाच्या जवानांना यश आले. या आग लागलेल्या वाड्याची माहिती मिळताच मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी घटनास्थळी भेट दिली.

या वाड्याला भेट देण्यासाठी महाराष्ट्रातून अनेक इतिहासकार पर्यटक भेट दिली आहे तसेच या वाड्यासंदर्भात अनेक वेळा प्रसार माध्यमे वर्तमानपत्र यामध्ये माहिती प्रसिद्ध झाली होती. त्या वाड्यात नाय निवाडे केले जात असत. या वाड्यामध्ये राजे महाराजे राणी महल तसेच गडावर असणाऱ्या सर्व सुविधा उपलब्ध होत्या परंतु कालांतराने सर्व लोप पावत गेल्या मागील गेले दहा वर्षापासून या वाड्याची अवस्था अत्यंत बिकट झाली असून सर्व वाडा निकामी झाला होता. या वाड्यात कोणीही राहत नसल्यामुळे दुर्लक्षित झाला होता आज अचानक ऐतिहासिक वाड्याला भिषण आग लागल्यामुळे नेपाळपाडा गावाची ऐतिहासिक अस्मिता नष्ट झाल्याची बाब दिसून येत आहे.

> नेवालपाडा गावातील चांदणी चौंकात हा १५० वर्षे पूर्वीचा ऐतिहासिक वाडा होता..अचानक लागलेल्या आगीत हा वाडा जळून खाक झाला आहे.
> वाड्याला आग लागतात गावातील सतर्क नागरिकांनी तात्काळ अग्निशामक दलाला पाचारण केले अग्निशमक दल येताच काही प्रमाणात आग आटोक्यात आली.
> वाड्याला लागलेल्या आगीत वाड्यातील जुनी भांडी जळाली आहेत.. त्याचबरोबर ऐतिहासिक वाडा नामशेष झाल्याचे चित्र दिसून येत आहे.
> – रोहित झुंजारराव ,सामाजिक कार्यकर्ते,नेवालपाडा,मुरबाड

# मराठी भाषेला समृध्द करणारे साहित्यिक डॉ नागनाथ कोत्तापल्ले



लेखक: श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

मराठीतील दिवंगत जेष्ठ साहित्यिक, विचारवंत डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांची आज जयंती. मराठी साहित्य विश्वातील एक प्रतिथयश साहित्यिक म्हणून ओळखले जाणाऱ्या डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांचा जन्म २९ मार्च १९४८ रोजी नांदेड जिल्ह्यातील मुखेड या गावी झाला. डॉ नागनाथ कोत्तापल्ले यांचे शिक्षण गावातीलच जिल्हा परिषदेच्या शाळेत झाले. १९६९ साली डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी देगलुर येथून बी ए ची पदवी मिळवली. बी ए ची पदवी मिळवताना ते मराठवाड्यात तिसरे तर मराठी विषयात पहिले आले होते. त्यानंतर मराठवाडा विद्यापीठातून त्यांनी एम ए पूर्ण केले आणि १९८१ साली यु. म. पठाण सरांच्या मार्गदर्शनाखाली शंकरराव पाटील यांच्या साहित्याच्या चिकित्सक अभ्यास या विषयावर पी एच डी मिळवली.

१९७१ ते १९७७ या काळात त्यांनी बीड येथील महाविद्यालयात अध्यापन केले. अध्यापक म्हणून म्हणून पवित्र कार्य करताना त्यांनी अनेक विद्यार्थी घडवले. नागनाथ कोत्तापल्ले १९७७ मध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात प्राध्यापक होते त्यानंतर ते पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख बनले. २००५ ते २०१० पर्यंत कोत्तापल्ले सर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू होते.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी १९७० पासून लेखनास सुरुवात केली. मुड्स हा त्यांचा कविता संग्रह १९७६ साली प्रसिद्ध झाला. त्यानंतर कर्फ्यु आणि इतर कथा व संदर्भ हे दोन कथा संग्रह प्रकाशित झाले. कवीच्या गोष्टी आणि सावित्रीच्या लेकी या त्यांनी लिहिलेल्या दीर्घ कथा त्या काळी त्या काळात खूप गाजल्या. या दरम्यान त्यांच्या गांधरीचे डोळे आणि मध्यरात्र या कादंबऱ्या आणि इतर बरेच ललित साहित्य प्रकाशित झाले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी कथा, कादंबरी, ललित लेख सोबतच समीक्षा लेखनही केले. साहित्याचा अन्वयार्थ, आधुनिक मराठी कविता, नव कथाकार शंकर पाटील, ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि बोध हे त्यांचे समीक्षात्मक ग्रंथ प्रसिद्ध आहेत. निवडक बी. रघुनाथ आणि स्त्री पुरुष तुलना या ग्रंथाचे संपादनही त्यांनी केले.

डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांनी अनेक महत्वाच्या पदावर अध्यक्ष म्हणून काम केले. नॅक, राज्य मराठी विकास संस्था, साहित्य अकादमी, राज्य ग्रंथ पुरस्कार समिती, बाल पुरस्कार समिती आणि एच. एस. सी बोर्डाचे मराठी अभ्यास मंडळ अशा महत्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. याशिवाय मराठी साहित्य परिषदेचे कार्यवाहकपदही त्यांनी सांभाळले. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर काही नियतकालिकांचे संपादकही होते. २०१२ साली चिपळूण येथे झालेल्या ८६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते.

जवळपास पाच दशके आपल्या समर्थ लेखणीने मराठी भाषेला समृद्ध करून डॉ नागनाथ कोत्तापल्ले सर ३० नोव्हेंबर २०२२ रोजी आपल्यातून निघून गेले. ३० नोव्हेंबर २०२२ रोजी वयाच्या ७४ वर्षी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले त्यांच्या निधनाने मराठी विषयाची अपरिमित हानी झाली. त्यांच्या निधनाने मराठी साहित्य विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली. डॉ नागनाथ कोत्तापल्ले सरांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

### अग्निशमन सेवा सप्ताहाद्वारे
# केडीएमसी क्षेत्रात करणार जनजागृती
## १ एप्रिल ते २० एप्रिल दरम्यान अग्निशमन सेवा सप्ताहाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका अग्निशमन व आणिबाणी सेवा विभागामार्फत प्रतिवर्षाप्रमाणे या वर्षीही "अग्निशमन सेवा सप्ताह" १ एप्रिल ते २० एप्रिल या कालावधीत " अग्निशमन सेवा सप्ताह" निमित्ताने अग्निशमन सेवेबाबत जनजागृती, साहित्याचे प्रदर्शन करणे व माहिती सांगणे व इतर संबंधीत कार्याकमांचे आयोजन करण्यात आले आहे.

"अग्निशमन सेवा सप्ताह" करीता संपूर्ण महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अग्निशमन केंद्रांच्या ठिकाणी आग व विमोचनाच्या साहित्याचे प्रदर्शनाचे आयोजन करणे. तसेच पालिका क्षेत्रातील विविध ठिकाणी अग्निशमन यंत्रणेबाबत जनजागृती करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमा व्यतिरीक्त ४ एप्रिल रोजी अग्निशमन अधिकारी व कर्मचारी यांच्या सराव स्पर्धेचे आयोजन बिर्ला वण्या, शहाड येथे करण्यात आले आहे. रविवार ६ एप्रिल रोजी सकाळी ७ वाजता सायकल रॅली द्वारे अग्निशमन सेवेबाबत जनजागृती करण्यात येणार असून अग्निमशन मुख्यालय, आधारवाडी ते छत्रपती शिवाजी महाराज चौक महम्मद अली चौक डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान मुरबाड रोड, बिर्ला कॉलेज मार्गे अग्निशमन मुख्यालय, आधारवाडी येथे सायकल रॅलीची सांगता होणार आहे.

महापालिका क्षेत्रातील सोसायट्यांतील ज्या सोसायटीमध्ये स्थायी अग्निशमन यंत्रणा सुस्थितीत व सतत चालू असेल अशा सोसायट्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. १४ ते २० एप्रिल या कालावधीत निवासी संकुले, औद्योगीक कारखाने व वसाहती तसेच मॉल, सिनेमागृहे, चौक, मार्केट, धार्मिक स्थळे, शैक्षणिक संस्था व खाजगी आणि शासकीय दवाखाने तसेच गर्दीच्या ठिकाणी अग्निशमन साधन सामुग्रीचे प्रदर्शन भरविणे व आजूबाजूच्या सोसायटया, शाळा, महाविद्यालयें, रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्या नागरीकांना माहिती देणे.

प्रत्येक आठवडयात प्रत्येक अग्निशमन केंद्रामार्फत आपल्या कार्यक्षेत्रातील एका प्रभागामध्ये अग्निशमन आग व विमोचनाबाबत जनजागृती करून हस्तपत्रके वाटण्यात येणार. महापालिका क्षेत्रातील शाळा, महाविद्यालये व इतर शैक्षणीक संस्थामध्ये माहिती देणे व शालेय विद्यार्थ्यांसाठी अग्निशमन यंत्रणेबाबत निबंध व चित्रकला स्पर्धाचे आयोजन करणे. महापालिका कार्यक्षेत्रातील सोसायटी फेडरेशन यांची माहिती गोळा करणे त्यांचे चर्चासत्र आयोजित करून अग्निशमन सुरक्षेबाबत माहिती देणे व संपर्क क्रमांक संग्रहीत करणे.

प्रत्येक निवासी सोसायटीतील पुरूष नोकरी निमित्ताने बाहरे असल्यामुळे सोसायटीतील महिलांना आगीबाबतचे प्रत्यक्षिके दाखवून विभागासंबंधी इतर माहिती सांगणे. प्रत्येक सोयायटीमध्ये अग्निमित्र तयार करून त्यांचा संपर्क नंबर आपल्या अग्निशमन केंद्राकडे संग्रहित ठेवावा व त्यांच्याशी अग्निशमन कामकाजांबाबत सतत संपर्कात रहावे.

अग्निशमन सेवा सप्ताहाला कालावधी संपल्यानंतर सर्व अग्निशमन केंद्रातील अधिकारी व कर्मचारी यांच्या मुलांची अग्निशमन सेवा या विषयाबाबत निबंध व चित्रकला स्पर्धेचे आजोजन करण्यात येणार असल्याचे मुख्य अग्निशमन अधिकारी नामदेव चौधरी यांनी सांगितले. तसेच ज्या रहिवासी संकुलांना अग्निशमन यंत्रणा सुरक्षेबाबत विशेष प्रशिक्षण आणि प्रात्यक्षिक ठेवायचे असल्यास 7498332472, 0251-2315101, 2310155 या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन देखील नामदेव चौधरी यांनी केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाद्वारे शिक्षकांना प्रशिक्षण





दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण :** छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय मुंबई च्या वतीने ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले होते. संग्रहालयात उपलब्ध असणारी माहिती शिक्षकांनी त्यांच्या वर्गातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावी, असे या प्रशिक्षणाचे उद्दिष्ट होते.

इतिहास, विज्ञान, संस्कृती आणि कला यांसारख्या विषयांमध्ये ग्रामीण भागातील शालेय विद्यार्थ्यांची रुची वाढवण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाने हा अभिनव उपक्रम राबविला. या प्रशिक्षण वर्गात महाराष्ट्रातील ८ जिल्ह्यांमधील शिक्षकांनी सहभाग घेतला होता. यामध्ये अलिबाग मधील चार शिक्षकांची निवड करण्यात आली होती. सदर प्रशिक्षण सत्रास 'कोलगाव येथील आर झी पी स्कूलचे रणजीत मळवी, मंडवा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे विश्वास पाटील, रायगड जिल्हा परिषद शाळेचे विजय पाटील आणि नित्यनाथ म्हात्रे यांचा समावेश होता.

शालेय शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (DIET) सहकार्याने, या कार्यक्रमात महाराष्ट्रातील आठ जिल्ह्यांतील २० शाळांमधून ३५ शिक्षक सहभागी झाले होते. यामध्ये नाशिकसह सातारा, यवतमाळ, धुळे, रायगड, अमरावती, रत्नागिरी आणि अहिल्यानगर येथील शिक्षकांचा समावेश होता. संवादात्मक कार्यशाळा, तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखालील सत्रे आणि प्रत्यक्ष क्रियाकलापांच्या माध्यमातून शिक्षकांना संग्रहालयातील वस्तू आणि सांस्कृतिक वारसा स्थळे यांचा शिक्षणात कशाप्रकारे उपयोग करता येईल याचे प्रशिक्षण देण्यात आले.

या प्रशिक्षणाचा भाग म्हणून शिक्षकांनी भाऊ दाजी लाड संग्रहालय, नेहरू विज्ञान केंद्र आणि एलिफंटा लेणी या स्थळांना भेट दिली. हा उपक्रम राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP 2020) शी सुसंगत आहे. विद्यार्थ्यांमध्ये संग्रहालयातील अभ्यासाची उत्सुकता, तर्कशुद्ध विचार आणि सांस्कृतिक जागरूकता वाढवण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. कार्यक्रमाबद्दल, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालयाचे संचालक सब्यसाची मुखर्जी म्हणाले, "संग्रहालयामध्ये इतिहास, विज्ञान आणि संस्कृती यांना एकत्र आणता येते. या उपक्रमाद्वारे आम्ही शिक्षकांना त्यांची शिक्षण पद्धती अधिक आकर्षक आणि सर्जनशील करण्यासाठी ज्ञान आणि साधने प्रदान करू इच्छित आहोत. छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय भारतीय शिक्षणाला अधिक सुलभ आणि आकर्षक बनवण्यासाठी सतत कार्यरत आहे."

या संग्रहालयाने शिक्षण क्षेत्रात अनेक उपक्रमांद्वारे योगदान दिले आहे, "म्यूझियम ऑन व्हील्स" या उपक्रमाद्वारे महाराष्ट्रातील अनेक शाळांमध्ये संग्रहालयातील अनुभव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवले आहेत.गेल्या तीन दिवसांमध्ये पार पडलेला प्रशिक्षण कार्यक्रम संग्रहालयाच्या या प्रयत्नांचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना संस्कृती आणि आपला ऐतिहासिक वारसा शिक्षणाद्वारे अधिक उपलब्ध करणे हेच या प्रशिक्षण वर्गाचे उद्दिष्ट आहे.

### दोन कोटीच्या खंडणीसाठी
# अपहरण केलेल्या चिमुकल्याची सुटका
## मानपाडा पोलीसांची कामगिरी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** दोन कोटीच्या खंडणीसाठी अपहरण केलेल्या सात वर्षाच्या चिमुकल्याची अवघ्या साडेतीन तासात पोलीसांनी सुटका केली असून याप्रकरणी दोन संशयीतांना ताब्यात घेण्याची कामगिरी मानपाडा पोलीसांनी केली आहे.

मानपाडा पोलीस ठाण्याच्या हद्दीत रिजेन्सी अनंतम, डोंबिवली पूर्व येथे राहणारे महेश भोईर यांचा ७ वर्षीय मुलगा सकाळी ७:३० वा. ते ९ वाजण्याच्या दरम्यान रिक्षातून शाळेला जात असताना खंडणीसाठी अपहरण झाल्याची तक्रार पोलीसांना सकाळी ९.३० वाजता दिली. खंडणीसाठी अपहरण करणाऱ्या आरोपींनी पैसे न दिल्यास तसेच पोलीसांना कळविल्यास मुलास जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती. पोलीसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखुन मानपाडा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदारांची ५ वेगवेगळी तपास पथके तयार करुन त्यांना अपहृत मुलाचा शोध घेण्याकरीता आजुबाजुच्या परीसरात रवाना करण्यात आलेले होते.

मानपाडा पोलीसांनी बारकाईने तपास करता अपहृत मुलास शाळेत घेवुन जाणारा रिक्षाचालक विरेन पाटील याचा पोलीसांना संशय आला. त्याअनुषंगाने पोलीसांनी विरेन विषयी तांत्रीक माहिती प्राप्त केली. त्यानंतर मिळालेल्या माहितीचे तांत्रीक विश्लेषण करुन विरेन पाटील आणि रिक्षाचा माग काढून अवघ्या साडेतीन तासात अपहृत मुलाची शहापुर येथून सुखरुप सुटका केलेली आहे. अपहृत मुलास त्याच्या आई-वडीलांच्या ताब्यात देण्यात आले आहे. या गुन्हयात दोन संशयीतांना ताब्यात घेण्यातं आले असुन इतर आरोपीचा शोध घेण्यात येत आहे.

हि कामगिरी अपर पोलीस आयुक्त संजय जाधव, पोलीस उप आयुक्त अतुल झेंडे, सहा पोलीस आयुक्त सुहास हेमाडे यांच्या मार्गदर्शनाखाली मानपाडा पोलीस ठाण्याचे वरिठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने, पोलीस निरीक्षक रामचंद्र चोपडे, जयपालसिंह गिरासे, दत्तातत्र गुंड, सहा पो निरीक्षक संपत फड़ोळ, महेश राळेभात, कलगोंडा पाटील, सागर चव्हाण, अभिजीत पाटील, हेमंत डोले, स्वाती जगताप तसेच पोहवा सुनिल पवार, राजेंद खिलारे, बाबा जाधव, संजु मसाळ, शिरीष पाटील, विकास माळी, सचीन साळवी, सुशांत पाटील, पोना यल्लपा पाटील, पोशि वाल्मीक शिंगोटे, विजय आव्हाड, अशोक आहेर, सोपान शेळके, योगेश आडे, घनःशाम ठाकुर, नाना चव्हाण, गणेश बडे, कृष्णा बोऱ्हाड, गणेश कोठुळे, बालाजी गरुड यांनी पार पाडलेली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

# राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात २५ कोटी ४४ लाखांचे अनुदान जमा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात आले.

जानेवारी, फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्याचे अनुदान आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रती गाय रु. ५०/- अनुदान योजनेंतर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या कार्याबद्दल मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी राज्य गोसेवा आयोगाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विभागाचा विकास गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधीक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या असून, देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरु असलेले काम प्रशंसनीय आहे. यामुळे देशी गोवंश संरक्षण व संवर्धन होणार असल्याचे, म्हटले आहे.

देशी गायींची उत्पादनक्षमता कमी आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड - अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नाही. असे पुशधन गोशाळेत ठेवण्यात येतात. अशा गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी असलेल्या गोशाळेतील गायींना ५०/- रुपये प्रती दिन गोवंश परिपोषण योजना सुरु केली आहे. ही योजना राज्यातील शेकडो गोशाळांना दिलासादायक ठरली असून, यातून आतापर्यंत ५६० गोशाळांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आल्याचे आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी सांगितले.

**ऑनलाईन अनुदान वितरण**

प्रसंगी आयोगाचे अध्यक्ष श्री. मुंदडा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

**असे आहे योजनेचे स्वरुप...**

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळांतील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रती दिन अनुदान देय राहिल. अनुदानाची रक्कमः रुपये ५० /- प्रती दिन प्रती देशी गाय असे आहे.

**अनुदान पात्रतेच्या अटी...**

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र आहेत. संस्थेस गोसंगोपनाचा कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असावा. गोशाळेत किमान ५० गोवंशीय पशुधन असणे आवश्यक आहे. संस्थेतील गोवंशीय पशुधनास ईअर टॅगिंग करणे अनिवार्य आहे.

ईअर टॅगिंग झालेले गोवंशीय पशुधन अनुदानास पात्र आहे. संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/मोप्र-१/दि.३०/११/२०१८ चे प्रपत्र

महाराष्ट्र शासन

## मृद व जलसंधारण विभाग

जिल्हा जलसंधारण अधिकारी मृद व जलसंधारण विभाग, कळवा, ठाणे. यांचे कार्यालय
कडा वसाहत, सहकार विद्यालयासमोर, जुना मुंबई-पुणे रोड, कळवा (प)
दूरध्वनी क्रमांक - 022-25428127 ई-मेल eemilsdnt@gmail.com

### ई-निविदा सुचना क्र. ब-१/६७/ सन २०२४-२५

जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे, मृद व जलसंधारण विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत कंत्राटदाराकडून खालील कामांकरीता ब-१ नमुन्यातील निविदा सिलबंद लिफाफ्यात मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://www.mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

कामाचे नांव :- १) मौजे - धसई-२, खुटल बारागाव ता. मुरबाड, जि. ठाणे येथे सिमेंट कॉंक्रीट बंधारा बांधणे.

| | | |
|---|---|---|
| निविदेची अंदाजित किंमत | : | १) रु. १,७२,०५,७११.००/- |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | :- | दिनांक २९/०३/२०२५ ते दिनांक १३/०४/२०२५. |
| ई-निविदा भरण्याचा कालावधी | :- | दिनांक २९/०३/२०२५ ते दिनांक १४/०४/२०२५. |
| ई-निविदा उघडणे | :- | दिनांक १५/०४/२०२५ (शक्य झाल्यास) |

खालील ठिकाणी ई-निविदा बाबतची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१ संकेतस्थळ http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सुचना मध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल)
२. संकेतस्थळ जाहिरातीची माहिती http://www.cemilspn.in
३. जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, ठाणे यांचे कार्यालयातील सुचना फलकावर.

जा.क्र. :- जिजअ/मृवजवि/ठाणे/लेशा-१/६६६/२०२५
दिनांक :- २५.०३.२०२५
कार्यालय :- जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग, कळवा-ठाणे

सही/-
फरीद खान
जिल्हा जलसंधारण अधिकारी
मृद व जलसंधारण विभाग कळवा- ठाणे.

*आरओसी क्रमांक : आरओसी-2024-25/क्र-5/C७३९६ दिनांक : २८/३/२०२५ माहिती व जनसंपर्क महासंचालनालय.

## गुढीपाडव्यानिमित्त कल्याणमध्ये रेखाटली महारांगोळी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : हिंदू नववर्ष गुढीपाडव्यानिमित्त कल्याणमध्ये महारांगोळी रेखाटली आहे. कल्याण पश्चिमेतील यशवंतराव चव्हाण क्रीडांगणात सुमारे २५ कलाकारांनी हि महारांगोळी साकार केली. रांगोळीची साईज ३० फूट X ३० फूट आहे. गुरुवारी रात्री ८ वाजता रांगोळी काढायला सुरुवात केल्यावर पहाटे ३ वाजेपर्यंत पूर्ण काढून झाली. संस्कार भारती संस्थेच्या या अथक प्रयत्नां बद्दल आयोजक इनरव्हील क्लब ऑफ कल्याण, कल्याण संस्कृती मंचने सर्व कलाकारांचे कौतुक केले. तसेच कल्याणकरांना या रांगोळी प्रदर्शनाला अवश्य भेट द्यावी असे आवाहन केले. हा कार्यक्रम नववर्ष स्वागत यात्रे निमित्त आयोजित केला आहे.

# गुलाबराव पाटील नेशन बिल्डर अवॉर्डने सन्मानित

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : विविध क्षेत्रात शिक्षण घेणारे विद्यार्थी या देशाचे भावी नागरिकआहेत त्यांना चांगले घडविले तर त्यांचा देशासाठी चांगला उपयोग होईल हा उद्देश डोळयासमोर ठेवून शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांचा रोटरी क्लब ऑफ कल्याण द्वारा अनेक वर्षापासून नेशन बिल्डर अवार्ड देऊन सन्मानित केले जाते. नुकताच कल्याण येथे सार्वजनिक वाचनालयाच्या रोटरी सभागृहात मुख्याध्यापक गुलाबराव पाटील यांना नेशन बिल्डर्स अवॉर्ड् देऊन सन्मानित करण्यात आले.



गुलाबराव पाटील हे मागील पंचवीस वर्षांपासून सम्राट अशोक विद्यालयात मुख्याध्यापक पदावर कार्यरत असून विद्यार्थ्यांकरिता वेगवेगळे प्रयोग उपक्रमाच्या माध्यमातून शैक्षणिक विकासाबरोबर सामाजिक बांधिलकी जपत अष्टपैलू विद्यार्थी घडविण्याचे काम करत आहेत. कोरोनाच्या काळात सुद्धा पाटील यांनी शिक्षकांकडून आर्थिक मदत घेत दिव्यांग नागरिकांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप केले. पाटील यांना 2018 ला महाराष्ट्र शासनाने आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित केले. बी. के. बिर्ला नाईट कॉलेजचे प्राचार्य डॉ. बिपीन वाडेकर, उद्योगपती मिलिंद कुलकर्णी, रोटरीचे अध्यक्ष पराग कापसे, सेक्रेटरी आत्माराम घाणेकर यांच्या हस्ते पाटील यांना नॅशन बिल्डर अवार्ड देण्यात आला.

# रविवारी बदलापूर येथे बंजारा महोत्सव

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : रविवार दिनांक ३० मार्च रोजी सायं ६ वा. छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण, माऊली चौक शिरगाव बदलापूर पूर्व येथे वामन म्हात्रे फाउंडेशन व बंजारा समाज बदलापूर यांच्या वतीने बंजारा महोत्सव आयोजित केला आहे. या महोत्सवाचे आयोजक म्हणून माजी नगरसेवक अरुण सुरवळ हे लाभले असून बंजारा समाजाची संस्कृती, इतिहास, बोलीभाषा टिकून राहावी यासाठी माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांच्या पुढाकाराने बदलापूर नगरीमध्ये प्रथमच बंजारा समाजाचा बंजारा महोत्सव संपन्न होणार आहे. या महोत्सवामध्ये बंजारा समाजातील कलाकार, गायक, पुढारी, समाज सेवक,वरिष्ठ अधिकारी, खेळाडू तसेच संत महंत मंडळी उपस्थित राहणार आहे. मुंबई, ठाणे, पनवेल, विरार, डोंबिवली, कल्याण, टिटवाळा, अंबरनाथ,नवी मुंबई परिसरातील सर्व समाज बांधवांनी सहकुटुंब परिवारासह पारंपारिक वेशभूषेमध्ये येऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी. असे सुकलाल चव्हाण, सुनील राठोड, रमेश आडे, बाळकृष्ण राठोड नायक, विनोद जाधव कारभारी, तसेच देविदास चव्हाण यांनी आवाहन केले आहे.




## कल्याणातील कॅप्टन ओक हायस्कूलमध्ये

# 'संवाद कृषीपुत्राशी' अनोखा उपक्रम

दैनिक जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याणातील बालक मंदिर संस्थेच्या कॅप्टन रवींद्र माधव ओक हायस्कूलमध्ये दि.१८मार्च२०२५ रोजी शालेय विद्यार्थ्यांसाठी 'संवाद कृषिपुत्राशी' हा आगळावेगळा मुलाखतीचा कार्यक्रम घेण्यात आला. या उपक्रमाची संकल्पना ही शाळेतील कलाशिक्षक श्री. कैलास यादव सरोदे यांनी मांडून त्याचे प्रायोजकत्वही त्यांनी स्वीकारले होते. या कार्यक्रमांमध्ये जळगांव जिल्ह्यातील लोहारा गावातील कृषिभूषण, कृषिरत्न शेतकरी श्री. विश्वासभाऊ आनंदराव पाटील यांच्याशी इ.९वी च्या विद्यार्थ्यांनी मुलाखतीच्या माध्यमातून संवाद साधला. भारत हा कृषिप्रधान देश आहे. देशातील शेतकरी, शेती, माती ,पाणी व वृक्षसंपदायाविषयी शालेय विद्यार्थ्यांना माहिती व्हावी, शेतकऱ्यांची व्यथा त्यांना समजावी व शेतीबद्दल त्यांच्यामध्ये आवड निर्माण व्हावी तसेच विद्यार्थ्यांमध्ये संवाद कौशल्य निर्माण व्हावे व त्यांचा आत्मविश्वास वाढावा, या हेतूने 'संवाद कृषिपुत्राशी' हा कार्यक्रम घेण्यात आला. या उपक्रमामध्ये इ.९वी मधील कु. माही राजेश म्हात्रे, दिया किशोर महाजन, आदिती किशोर पाटील, यश सुरेश शेलार व शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिलीप तडवी, ज्येष्ठ शिक्षक श्री. उत्तम गायकवाड, श्री. कैलास सरोदे, श्री. रमाकांत सोनवणे, क्रीडा शिक्षक श्री. गजानन पाटील व कलाशिक्षक श्री. पांडुरंग भारती यांनी सहभाग घेतला होता. तसेच या कार्यक्रमाध्ये




कल्याण उपविभागीय कृषि कार्यालयाचे कृषि अधिकारी श्री. अशोक भागाजी गायकवाड साहेब व श्री. अविनाश पद्माजी वडते साहेब आणि श्री.एन. एम.भामरे सर व श्री. ज्ञानेश्वर घुगे सर यांनी देखील आवर्जून उपस्थित राहून सहभाग घेतला होता.यावेळी श्री. अविनाश वडते साहेब यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले की, संवाद कृषिपुत्राशी हा खूपच आगळावेगळा उपक्रम आहे, अशा उपक्रमांची सध्या गरज आहे. शाळेने हा कार्यक्रम आयोजित केला याचा आम्हांला खूप आनंद झाला .यापुढे आमच्या कल्याण उपविभागीय कृषि कार्यालयातर्फे देखील आम्ही अशा कार्यक्रमांचं आयोजन करू असे आवर्जून सांगितले.

या संवादाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी श्री. विश्वासभाऊ यांना अनेक प्रश्नांच्या माध्यमातून शेतीविषयी जाणून घेतलं. तसेच समोर बसलेल्या विद्यार्थी व शिक्षकांनीही काही प्रश्न विचारून उत्तम प्रकारे संवाद साधला. विद्यार्थ्यांनी विश्वास भाऊंना तुम्ही आदर्श कुणाला मानता? असं विचारलं असता... भाऊंनी मी निसर्गाला व साऱ्या सृष्टीला आदर्श मानतो. निसर्ग हा आपल्याला खूप काही देतो म्हणून मी त्याला आदर्श मानतो असं सांगितलं. शेतीविषयी कृतज्ञता व आदराची भावना व्यक्त करतांना विश्वासभाऊ म्हणाले की, या शेताने लळा लाविला असा असा की, सुख दुःखाला परस्परांशी हसलो ,रडलो... आता तर हा जीवच अवघा असा जखडला, मी त्याच्या हिरव्या बोलीचा शब्द जाहलो...! या ओळीतून पद्मश्री कविवर्य ना.धो.महानोर (दादा) यांच्या काव्यपंक्तीची आठवण करून दिली.तसेच यावेळी धरतीचं महत्त्व विषद करतांना... अशी धरित्रीची माया, अरे तिले नाही सीमा ... सरव्या दुनियेचं पोट तिच्यामध्ये झाले जमा...! या कवयित्री बहिणाबाईंच्या ओळींचीही त्यांनी आठवण करून दिली.

जेव्हा विद्यार्थ्यांनी विश्वास भाऊंना आपल्या खंतविषयी विचारले असता...भाऊ म्हणाले...! जी भूमाता आहे, जी जमीन आहे, जी पोशिंदी आई आहे, तिच्यावरचं वस्त्र, लुगडं, साडी, पितांबर व महावस्त्र यांचं रोज वस्त्रहरण होत आहे. कोणताही काडी ,कचरा शेतकऱ्यांनी जाळू नये. काडी, कचरा हेच सजीव जिवाणूंचं अन्न आहे .संबंध विश्वातील जमीन जी आहे ,ती नापिकीकडे जात आहे, तिला कुबड्या लावल्या जाताय; ही माझ्या मनातील खंत आहे.जमिनीला आपण श्रीमंत करा,ती आपल्याला श्रीमंत करेल! पिकाची फेरपालट हा कोणत्याही शेतीचा आत्मा आहे, आंतरपीक पद्धती, मिश्रपीक पद्धती, सापळा पीक पध्दती,आच्छादन, वापसा, हिरवळीची पिकं , एक गाय, बांधावर वृक्षारोपण , मृदसंधारण, जलसंधारण, ठिबक सिंचन व शेतीला पाणलोट करा असा मोलाचा सल्लाही भाऊंनी दिला. पुढच्या पिढ्यांना जर सजीव ठेवायचं असेल, तर मातीला तुम्ही जिवंत ठेवलं पाहिजे! हा संदेशही त्यांनी दिला.

उपस्थित श्री.एन.एम. भामरे सरांनी विश्वास भाऊंना विचारले असता... शासनाकडून आपण शेतकरी म्हणून आपल्या काय अपेक्षा आहेत?तेव्हा भाऊ म्हणाले की, शासनाने शेतकऱ्यांना फक्त पाणी, वीज उपलब्ध करून द्यावे तसेच ओंजळभर शुद्ध बियाणे व उत्पादन खर्चावर आधारित भाव द्यावा,बाकी आम्हाला काही नकोय! असं सांगितलं!विश्वास भाऊ पुढे आपल्या शेती निष्ठेविषयी म्हणाले... हे परमेश्वरा पुनर्जन्म असेल, नसेल मला माहित नाही, परंतु पुनर्जन्म असेलच तर मला कोरडवाहू शेतकऱ्यांच्या पोटी जन्माला घाल!अशी इच्छा व्यक्त केली.कारण तेथे मला सृजनता निर्माण करता येईल!भाऊंना विद्यार्थ्यांनी सुखद आठवणी बद्दल विचारले असता...ते म्हणाले...! आज मी कल्याणच्या कॅप्टन ओक हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसमोर संवाद साधतोय हा प्रसंग तसेच आतापर्यंत गावापासून जिल्ह्यापर्यंत व दिल्लीपर्यंत अनेक मान्यवरांनी माझ्या पाठीवरती थाप दिली, हेच माझ्यासाठी सुखद प्रसंग आहेत, अशा भावना व्यक्त केल्या. यावेळी शाळेतील कला शिक्षक श्री. पांडुरंग भारती यांनी शाळेतील मुलं अन्न वाया घालवता याबद्दल भाऊ आपण मुलांना काय सांगाल? असा प्रश्न विचारला असता... विश्वास भाऊ विद्यार्थ्यांना म्हणाले...! की, अन्नधान्याचा जेव्हा तुटवडा होता, तेव्हा आपल्या देशाला अमेरिकेहून पी.एल.४८० हा गहू मागवायचे आणि तो आपल्याला रेशन दुकानात मिळायचा. इतकी वाईट परिस्थिती अन्नाच्या बाबत देशात होती, यातून भाऊंनी अन्नाचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले. यावेळी इ.९वीतील विद्यार्थिनी भावनिक होऊन, विश्वास भाऊंना पाहून म्हणाली की, भाऊ माझे आजोबाही शेतकरी होते आणि तुम्हाला पाहून मला माझ्या आजोबांची आठवण झाली आणि ते कशी शेती करत असतील? याची कल्पनाही मला मिळाली! यावेळी त्या विद्यार्थिनीचे व विश्वास भाऊंचेही डोळे भरून आले होते. यावेळी कु. यश शेलार याने विचारले की , भाऊ केमिकलयुक्त कलिंगड कसं ओळखायचं? तेव्हा भाऊंनी सांगितलं की, जे कलिंगड खूप लाल दिसत असेल तर ते केमिकलयुक्त इंजेक्शन देऊन लाल केलंय असं समजावे, एवढेच नाही ,तर जो भाजीपाला अतिशय तजेलदार व हिरवा दिसत असेल तर तोही केमिकल युक्त आहे असं समजावे!

यावेळी शाळेतर्फे श्री. विश्वास भाऊंना शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिलीप तडवी सर यांनी सन्मानचिन्ह देऊन सन्मानीत केले. तसेच कल्याणचे कृषि अधिकारी श्री. अशोक भागाजी गायकवाड साहेब व श्री. अविनाश पद्माजी वडते साहेब यांचाही शाळेतर्फे गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.तसेच सहभागी विद्यार्थ्यांना या कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला म्हणून सन्मानचिन्ह देऊन शाळेतर्फे कौतुक करण्यात आले.

शाळेत शालेय विद्यार्थ्यांसाठी 'संवाद कृषिपुत्राशी' हा आगळावेगळा उपक्रम राबवल्याबद्दल संस्थेचे पदाधिकारी श्री. मयुरेश गद्रे, डॉ.श्री. सुश्रुत वैद्य, श्री. प्रसाद मराठे, श्री रमेश गोरे, विश्वस्त सौ. तेजस्विनी पाठक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,पालक व शाळेचे मुख्याध्यापक श्री. दिलीप तडवी सरांनी कलाशिक्षक श्री. कैलास सरोदे यांचे भरभरून कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील ज्येष्ठ शिक्षक श्री. उत्तम गायकवाड सरांनी अप्रतिम असे केले.

# कल्याण पूर्व शिवसेनेत पक्षांतर्गत धुसफूस

## उपशहरप्रमुख पर्यंत सर्व कार्यकारणी बरखास्त

दैनिक जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेतील शिवसेनेत फार आधीपासूनच अंतर्गत धुसफूस असल्याचे समोर येत आहे. शिवसेनेच्या विभाजनानंतर एकनाथ शिंदें सोबत असलेल्या पदाधिकारी वर्गातही गटतट बनल्याने पक्षासाठी हे नुकसानकारक बनले आहे. कोळसेवाडी पोलीस स्थानकात शिंदेंच्या पदाधिकाऱ्यांमध्ये झालेल्या राड्यानंतर आता शिंदेंच्या सेनेने शेवटी कल्याण पूर्वेतील महत्त्वाच्या फळीची कार्यकारिणी बदलून टाकण्याचा निर्णय घेतला आहे.

शिवसेनेचे कल्याण जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे यांनी गुरुवारी एक परिपत्रक जारी केले असून त्यांनी कल्याण पूर्वेतील पुरुष व महिला उप शहरप्रमुख पर्यंतची सर्व पदे स्थगित करीत असल्याचे म्हटले आहे. तर आजवर केलेल्या कामाचा आढावा घेऊन नव्याने मुलाखती घेऊन पुन्हा नव्याने पद नियुक्ती केली जाईल असेही त्यांनी या परीपत्रकात म्हटले आहे. यामुळे सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत.

मागील महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना हा कल्याण पूर्वेतील मोठा पक्ष ठरला होता. पुढे शिवसेनेचे दोन भाग झाल्यानंतर शिंदेंच्या शिवसेनेने तरीही आपलं पारडं जड ठेवलं. अगोदरच पक्षात गटातटाचे राजकारण असताना त्यातच विधानसभा निवडणुकीत शहर प्रमुखाने बंड पुकारल्याने पक्षाने त्यांच्यावर कारवाई केली. यानंतर आता पुन्हा एक अंतर्गत वाद बाहेर पडल्यानंतर कल्याण जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांनी मोठा निर्णय घेत पदांची नवनियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. कल्याण पूर्वेतील अंतर्गत डॅमेज कंट्रोल करण्यासाठी आता खासदारांना विशेष लक्ष द्यावे लागतेय का? असे सवाल उपस्थित केले जात आहेत. परिस्थिती न बदलल्यास याचा फटका पक्षाला आणि लाभ मात्र इतरांना मिळू शकतो.



# प्रधानमंत्री ३० मार्चला महाराष्ट्रात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ३० मार्च रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असून, नागपुरातील विविध महत्त्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री श्री.मोदी यांच्या हस्ते सोलार डिफेन्स आणि एअरोस्पेस लिमिटेड येथे संरक्षण क्षेत्रातील अत्याधुनिक प्रकल्पांचे उद्घाटन होणार आहे. यामध्ये अनमॅन्ड एरियल व्हेईकल्ससाठी १२५० मीटर लांबीची विशेष धावपट्टी आणि लोइटरिंग म्युनिशन चाचणीसाठी अत्याधुनिक सुविधा राष्ट्राला समर्पित केली जाणार आहे. तसेच नागपुरातील माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरच्या विस्तार प्रकल्पाची पायाभरणीही प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत केली जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत २५० खाटांचे रुग्णालय, १४ बाह्यरुग्ण विभाग आणि अत्याधुनिक १४ ऑपरेशन थिएटर उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे नागपूर आणि विदर्भातील नागरिकांना जागतिक दर्जाच्या नेत्रचिकित्सा सुविधा उपलब्ध होणार आहेत. प्रधानमंत्री श्री.मोदी दीक्षाभूमी येथे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'प्रतिपदा' कार्यक्रमानिमित्त स्मृती मंदिराला भेट देऊन संघ संस्थापकांना अभिवादन करतील.

## संक्षिप्त

# कल्याण पंचायत समिती शिक्षण विभागाच्या कामावर शिक्षकच नाराज

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : एकीकडे 100 दिवसांचा कृती कार्यक्रम सुरु असताना, दुसरीकडे मात्र कल्याण पंचायत समिती शिक्षण विभागात मात्र कामा निमित्त येणाऱ्या शिक्षकांना अपमानस्पद वर्तणुकीस सामोरे जावे लागते. आहे.

चहा पेक्षा किटली गरम या उक्ती प्रमाणे कल्याण पंचायत समिती शिक्षण विभागातील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांरी शिक्षकांशी वर्तन करत असतात. या कार्यालयात कोणीही शिक्षक काही कामासाठी आले की हे कर्मचारी या शिक्षकांना या खुर्चीवर बसू नका, इथे उभे राहू नका, अशा शब्दात अपमाणीत करतात वरून सूचना दिल्याचा आव आणत असतात. शिक्षक हे काही कामानिमित्त कार्यालयात येत असतात ,त्यांना बसण्यासाठी खुर्चीवर ही पाबंदी आहे का ? किंवा उभे राहण्याचीही बंदी आहे का ? हे चतुर्थी श्रेणी कर्मचारी शिक्षकांवर अरेरावी करणे, कामाला विलंब लावणे हे तर रोजचेच आहे. यांची ही वर्तणूक व्यक्तीनिहाय असते. या कर्मचाऱ्यांना जाब विचारणारे कोणी आहे का ? किंवा यांच्या या वागण्यावर कोणी निर्बंध लावणार आहे की नाही ? हा प्रश्न या निमित्ताने विचारला जात आहे.

# कल्याण डोंबिवली महापालिकेच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा

### *राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता अभियान व स्पर्धेत केडीएमसी द्वितीय*

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्र शासनाच्या उत्तरदायी सुलभ, पारदर्शी आणि गतिमान प्रशासनाच्या अनुषंगाने राजीव गांधी प्रशासकीय गतिमानता (प्रगती) अभियान व स्पर्धा, सन 2024 -25 अंतर्गत राज्यस्तरावरील थेट प्रस्ताव आणि विभागीय समित्यांकडून प्राप्त प्रस्ताव यांच्यामधून राज्यस्तरीय निवड समितीने केलेल्या मूल्यमापनानुसार महापालिका स्तरावरून प्राप्त झालेल्या प्रस्तावातून शासनाच्या दिनांक 26/03/2025 च्या शासन निर्णयाद्वारे कल्याण डोंबिवली महानगरपालिकेला ६ लाखांचा द्वितीय पारितोषिक जाहीर करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्र शासनांतर्गत येणाऱ्या विविध कार्यालये, विभाग, महानगरपालिका, शासकीय संस्था, कर्मचारी यांनी आपले प्रस्ताव सादर केले होते.

स्पर्धेतील सात कार्यक्षेत्रांपैक (१. कार्यालयीन व्यवस्थापनामध्ये आधुनिक संकल्पना व व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब, २. सेवांची गुणवत्ता/ दर्जा यामधील वाढ व उपक्रमांची परिणामकारता, ३. लोकाभिमुखता ,४." इ - गव्हर्नन्स",५. संसाधनांचा पर्याप्त व प्रभावी वापर,६. तंटा/ तक्रार मुक्त कार्यालय, ७.नाविन्यपूर्ण व पथदर्शी स्वरूपाच्या संकल्पना /प्रयोग/ उपक्रम कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने यामधील इ- गव्हर्नन्स या कार्यक्षेत्रांतर्गत अर्ज दाखल केला होता.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या "परिवर्तन" या प्रकल्पामुळे ई गव्हर्नन्स विभागाच्या " मायनेट-२" दोन प्रणालीद्वारे मालमत्ता करविषयक सर्व सेवा सुविधा ऑनलाइन व २४*७ सहजपणे उपलब्ध करून दिल्याने नागरिकांमध्ये ऑनलाईन सेवाबाबत पसंती व विश्वास निर्माण झाल्याने महानगरपालिकेच्या सन२०२३-२४ या आर्थिक वर्षाच्या वसुलीत उल्लेखनीय वाढ झालेली आहे.

मालमत्ता कर विषयक सर्व सेवा व सुविधा ऑनलाईन २४*७ सहज उपलब्ध करून दिल्याने नागरिकांना महापालिकेबद्दलचा विश्वास निर्माण झाला आणि त्यामुळे महापालिकेच्या मागील वर्षाच्या तुलनेत सन २०२३-२४ मध्ये मालमत्ता करवसुलीत लक्षणीय वाढ झालेली दिसून आली व त्यात ऑनलाइन मालमत्ता कराचा वाटा जास्त आहे. या पारितोषिकामुळे महापालिकेच्या शिरपेचात आणखीन एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

### म्हारळ ग्रामपंचायत तर्फे

# आदिवासी मंडळाना भांडी तर अंगणवाड्यांना विविध साहित्याचे वाटप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील म्हारळ ग्रामपंचायतीच्या वतीने १५व्या वित्त आयोगातून आदिवासी विकास मंडळांना समाज उपयोगी भांडी तसेच ग्रामपंचायत हद्दीतील१२अंगणवाड्यांना ग्रामनिधीतून मुलासाठी विविध खेळाचे साहित्य वाटप सरपंच श्रीम निलिमा नंदू म्हात्रे यांच्या हस्ते आणि सर्व सदस्यांच्या उपस्थितीत नुकतेच करण्यात आले.यामुळे मंडळासह नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



म्हारळ ग्रामपंचायत तालुक्यात मोठी ग्रामपंचायत आहे, गावातील आदिवासी मल्हार महादेव कोळी, समाज उन्नती मंडळ व संकल्प आदिवासी मित्र मंडळ यांना१५व्या वित्त आयोगातून समाज उपयोगी जेवणाची भांडी यामध्ये मोठे टोप, शेगडी, बादल्या, कावळे, कालते, ड्रम, इत्यादी भांडयाचा समावेश आहे तर ग्रामपंचायत हद्दीतील१२अंगणवाडयांना विविध खेळाचे साहित्य हे ग्रामपंचायतीच्या ग्रामनिधीतून देण्यात आले, या साहित्याचे वाटप नुकतेच म्हारळ ग्रामपंचायतीच्या सरपंच श्रीम निलिमा नंदू म्हात्रे यांच्या हस्ते आणि इतर ग्रामपंचायतीचे सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी अँड दिपक अहिरे, किशोर वाडेकर, विकास पवार, वेदिका गंभीरराव, अश्विनी देशमुख, मंगला इंगळे, बेबी सांगळे, मोनिका गायकवाड, नंदा म्हात्रे,प्रगती कोंगिरे, अमृता देशमुख, लक्ष्मण कोंगिरे,आणि योगेश देशमुख, व ग्रामपंचायत अधिकारी अमोल मुरबाडे आदी मंडळी उपस्थित होते. यामुळे आदिवासी मित्र मंडळाचे सदस्य तसेच नागरिकांनी याबद्दल समाधान व्यक्त केले.

# नामस्मरण हीच खरी भक्ती व सुख समाधानाचे साधन होय

**– हभप नारायण काळे**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पारनेर : रांधे - श्री स्वामी समर्थ महाराज आपल्या आपल्याजवळ व अंतकारणात आहे , त्यांचे नामस्मरण हीच खरी भक्ती व सुख समाधानाचे साधन होय , असे प्रतिपादन ज्ञानमार्तंड हभप नारायण महाराज काळे यांनी केले .



पारनेर तालुक्यातील सर्वांत मोठे प्रशस्त , निसर्ग रम्य व लोक सहभागातून उभे राहिलेले रांधे च्या माळवाडी येथील अनिल आवारी यांच्या संकल्पनेतील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या देवस्थान मंदीर परिसरात पैठण येथील श्री स्वामी कथाकार , ज्ञानमार्तंड हभप नारायण महाराज काळे यांच्या सुश्राव्य वाणीतील श्री स्वामी कथेच्या पहिल्या दिवशी च्या कथे प्रसंगी बोलताना महाराज पुढे म्हणाले की , आज रांधेच्या या माळवाडीत साक्षात भक्त पंढरी अवतरली असून अक्कलकोट चे श्री स्वामी समर्थ महाराज हे साक्षात रांधेत अवतरले आहेत . या कथेच्या निमित्ताने अथक परिश्रम घेऊन अतिशय उत्तम, निट नेटके नियोजन केले . त्यांनी तुम्हांला ही सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली .भाविक भक्तांनी कोणाच्या ही माध्यमातून भक्ती व चरित्राचे श्रवण केले , तरी आनंद व समाधान मिळते . अनिल आवारी यांनी लोकसहभागातून रांधे सारख्या ग्रामीण भागात एवढे सुसज्ज व भव्य मंदीर उभे केले . या स्वामी कथेसाठी त्यांनी परिश्रम पूर्वक नियोजन केले . स्वामींनी दिलेला उपदेश म्हणजे नामस्मरण होय . दुःखात जरी स्वामींचे नामस्मरण केले , तरी ते धीर देऊन म्हणतात ," भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ", त्यामुळे मनात कोणतीही शंका न ठेवता निशंक पणे ही स्वामी कथा श्रध्देने ऐकल्यावर तेवढीच ही कथा सुंदर वाटेल . स्वामींचे " नामस्मरण ही च खरी भक्ती व सुख समाधानाचे साधन " आहे . स्वामी आपल्याजवळ व अंतकरणात आहे . त्यामुळे भाविक भक्ताला हवे ते मिळविण्याची संधी या कथेत आहे . किती मंद बुद्धी असलेल्या मुलाने ही कथा ऐकली, तर तो परीक्षेत यशस्वी होतोच . श्री स्वामी कृपेने अपंग माणूस सर्वांत मोठे शिखर असलेले कळसूबाई चे शिखर चढू शकतो . श्री स्वामी समर्थ चरित्र आगाध असून माझ्याकडून संपूर्ण जीवन चरित्र वर्णन होऊच शकत नाही . माझ्यावर जर श्री स्वामी कृपा असेल , तर मी जास्तीत जास्त स्वामी कथा सांगू शकतो . स्वामी कथेतून दिव्य अनुभूती येते , त्यासाठी भाविकांनी श्रध्देने कथा श्रवण करा , त्यासाठी पूर्ण तल्लीन व्हा . श्री स्वामी समर्थ महाराज हे दत्त गुरुंचे ४थे अवतार म्हणजे साक्षात दत्त गुरुंचे अवतार आहे . श्री स्वामी समर्थ हे शब्द व अक्षरे नाहीत , तर दुःखातून बाहेर काढणारा मंत्र आहे . समस्या नाही , असा एक ही व्यक्ती नाही .

आपल्याला जे नको असते , नेमके मन तेथेच जाते , मन खूप चंचल आहे . ज्ञानरूपी मंदिरात जायचे असेल , तर सेवारूपी वाळवंटातून जावे लागते . मंत्राचे उच्चारण करण्यासाठी काही नियम असतात , ते पाळावे लागतात . जो कोणी आई वडीलांचे दोन्ही हात जोडून चरण स्पर्श करीन . तीन वेळा त्यांना प्रदक्षिणा घालीन , त्याची पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण होईल , हीच खरी आई वडीलांची सेवा आहे , असे ही ज्ञानमार्तंड हभप नारायण महाराज काळे यांनी किर्तन सेवेच्या कथेतून शेवटी उद्बोधन केले .

श्री स्वामी समर्थ महाराजां ची पहिल्याच दिवसाची कथा श्रवण करण्याकरिता पारनेर , जुन्नर तालुक्यातील महिला , पुरुष , आबालवृद्ध भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते . तदनंतर उपस्थित भाविक भक्तांच्या हस्ते श्री स्वामी समर्थ महाराजां ची महाआरती घेण्यात आली .

यावेळी ज्ञानमार्तंड हभप नारायण महाराज काळे यांचा सन्मान महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य व नगर जिल्हा सचिव सुरेश खोसे पाटील यांच्या हस्ते करण्यात आला . महाप्रसादाने पहिल्या दिवशी च्या कथेला पुर्णविराम देण्यात आला.

रांध्या सारख्या छोट्या गावात ते ही माळवाडी सारख्या छोट्या वाडीत अनिल आवारी या छोट्या स्वामी भक्तानी लोकसहभाग व लोक वर्गणीतून श्री स्वामी समर्थ महाराजां चे दिव्य , अद्भूत , निसर्ग रम्य, देखणे मंदीर उभे करून तेथेच श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनाच्या कालखंडात राज्यात प्रसिद्ध असलेले स्वामी कथेचे किर्तनकर , ज्ञानमार्तंड या उपाधीने सन्मानित क्षेत्र पैठणचे हभप नारायण महाराज काळे यांच्या मुखातून स्वामी कथेचे नियोजन केल्याने भाविक भक्तांचे जथ्ये चे जथ्ये पहिल्याच दिवसांपासून रांधे च्या माळवाडी कडे रवाना होताना दिसत आहे . कथेचे अतिशय निटनेटके नियोजन , उत्कृष्ठ बैठक व्यवस्था , लाईट व साऊंड सिस्टीम , कार्यकर्त्यांमार्फत दुचाकी , चार चाकी पार्किंग नियोजन , महाआरती साठी मान्यवर तदनंतर शिस्तबद्ध पद्धतीने मिष्ठान्नाचा महाप्रसाद . वाखाण्याजोगे नियोजनाचे सर्वां जण कौतूक करत आहे .

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या

# ठाणे जिल्हा अध्यक्षपदी शंकर करडे तर मुरबाड तालुका अध्यक्षपदी दिलीप पवार

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : पत्रकारांच्या हक्काची नोदणीकृत संघटना असणाऱ्या महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांच्या सुचने नुसार या संघाच्या ठाणे जिल्हा अध्यक्षपदी पत्रकार शंकर महादेव करडे यांची तर मुरबाड तालुका अध्यक्षपदी पत्रकार दिलीप अनंत पवार यांची आज प्रदेश संघटक नितीन शिंदे यांच्या उपस्थितीत निवड करण्यात आली. तर या प्रसंगी ठाणे जिल्हा पदाधिकारी व मुरबाड, शहापूर, कसारा, भिवंडी, कल्याण ग्रामीण तालुका पदाधिकाऱ्यांना ही संघाचे प्रदेश संघटक नितीन शिंदे यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई कडून देण्यात आलेल्या नियुक्तीपत्रात म्हटले आहे की, तुम्ही पत्रकारितेच्या क्षेत्रात दिलेले प्रशंसनीय योगदान आणि पत्रकार हितासाठी काम करण्याची तुमची आवड लक्षात घेऊन, संघटनेचे प्रदेशाध्यक्ष मा. श्री. वसंतराव मुंडे यांच्या सुचनेनुसार व कोअर कमिटीने घेतलेल्या सर्वानुमते निर्णयाच्या आधारे तुमची संघटनेच्या महत्वाच्या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेच्या माध्यमातून तुम्ही तुमची जबाबदारी पार पाडाल. तुमच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी पूर्ण निष्ठेने आणि प्रामाणिकपणे पार पाडावी अशी अपेक्षा आहे. संघटना मजबूत करण्यासाठी मोलाचे योगदान द्याल अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



मुरबाड येथील शिवनेरी शासकीय विश्रामगृह येथील हॉल मध्ये पार पडलेल्या नियुक्तीपत्र प्रदान समारंभात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेश संघटक नितीन शिंदे यांनी कोकण विभाग उपाध्यक्षपदी संदीप पालवी, ठाणे जिल्हा ग्रामीण अध्यक्षपदी शंकर करडे, भगवान फर्डे - ठाणे जिल्हा उपाध्यक्ष, संतोष राऊत - ठाणे जिल्हा संघटक, रमाकांत पालवे ठाणे जिल्हा - सचिव, मुरबाड तालुका अध्यक्ष दिलीप पवार, तालुका सचिव संजयजी बोरगे, उपाध्यक्ष सुभाष जाधव, कार्याध्यक्ष विलास जाधव, व्हिडिओ डिजिटल मीडिया मुरबाड तालुका अध्यक्षपदी युवा पत्रकार चेतन सुधीर पोतदार, मुरबाड तालुका प्रसिद्धीप्रमुख रोहित झुंझारराव, बदलापूर तालुका अध्यक्षपदी तुषार डबरे यांची निवड करण्यात आली. या नवनियुक्त कार्यकारणी मुळे ठाणे जिल्हात संघटनेला निश्चितच बळ मिळेल.

# मुरबाड मधे बिबट्याचा वावर

### *बिबट्याच्या हल्ल्यात पाळीव कुत्रा ठार*

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड तालुक्यातील ग्रामीण भागात बिबट्याचा वावर दिसून आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. २६ मार्च २०२५ रोजी बिबट्याने जांभुर्डे येथील प्रकाश तरे यांच्या पाळिव कुत्र्यावर हल्ला करीत कुत्र्याला ठार केल्याची घटना घडली आहे ... मुरबाड मधील जांभुर्डे गाव परिसरात घराबाहेरील असलेल्या पाळिव कुत्र्यावर बिबट्याने हल्ला चढवित कुत्र्याला ठार केले या मुळे परिसरात भितीचे वातावरण पसरले असून वन विभागाकडून जनजागृती करण्यात आली असून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी होत आहे.

# नवोदय विद्यालय स्पर्धा परीक्षेत खारपाडा शाळेच्या विद्यार्थ्यांचे सुयश



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : नुकत्याच पार पडलेल्या नवोदय विद्यालय स्पर्धा परीक्षेत रायगड जिल्हा परिषद सेमी इंग्रजी उच्च प्राथमिक शाळा खारपाडा या शाळेतील यश अंजली रामचंद्र पाटील व श्रीराज ज्योती दिनकर पाटील या दोन विद्यार्थ्यांची निवड झाली असून त्यांचे अभिनंदन होत आहे.मागील वर्षी देखील प्रियांश चंद्रकांत घरत याची निवड झाली होती.

शाळा नेहमीच विविध स्पर्धा परीक्षा, नवनवीन उपक्रम, कला क्रीडा या क्षेत्रात उत्तम कामगिरी करीत आहे. सन 2024/25 या वर्षात मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा क्रमांक 2 मध्ये जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांकाचे स्थान मिळविले आहे. याकरता पेण पं सं. गटशिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे, जिते केंद्राचे केंद्रप्रमुख मुकुंद पाटील यांच्या मार्गदर्शनाने शाळेचे उत्तम प्रशासन सांभाळणारे मुख्याध्यापक प्रविण पाटील ज्यांना समाज गौरव पुरस्कार, राज्यस्तरीय गुणवंत पुरस्कार,व जिल्हास्तरीय शिवभूमी पुरस्कार, एम्पोर फाउंडेशन चा आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार, अखिल प्राथमिक शिक्षक संघाचा गुणवंत शिक्षक पुरस्कार व ग्रुप ग्रामपंचायत खारपाडा यांच्यातर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार अशा विविध पुरस्काराने सन्मानित केले असून त्यांच्या संपूर्ण मार्गदर्शनाखाली व शाळा व्यवस्थापन कमिटी यांच्या सहकार्याने सहशिक्षक दिनकर पाटील, वर्गशिक्षिका सौ नंदिनी कदम, सौ. ज्योती पाटील, सौ. संगीता पाटील, सौ. सुरेखा रुपनर हे देखील शाळेतील प्रत्येक उपक्रमात व स्पर्धा परीक्षेसाठी उत्तम कामगिरी करत असून शाळा यश संपादन करीत आहे. शाळेचे सर्व स्तरातून विशेष कौतुक होत असून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# घोटसई ग्रामपंचायतीमध्ये घरकूल योजनेचे भूमीपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण तालुक्यातील घोटसई ग्रामपंचायतीमध्ये घरकूल भूमीपूजन कार्यक्रम जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांच्या उपस्थितीत पार पडला. मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार राज्यामध्ये '100 दिवसांचा कृती कार्यक्रम' व 'महा आवास अभियान सन 2024-25' अंतर्गत राबविण्यात येत आहे.




यामध्ये घरकुलांना उद्दिष्टाप्रमाणे मंजुरी देणे, मंजुर घरकुलांना पहिला हप्ता वितरीत करणे, सर्व घरकुले भौतिकदृष्टया पूर्ण करणे हे उपक्रम समाविष्ट आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या निर्देशानुसार जिल्हयात सर्वत्र एकाच दिवशी 16 हजार 903 घरकुल लाभार्थ्यांच्या घरकुलांचे भूमिपूजनाचा कार्यक्रम गुरुवारी आयोजित करण्यात आलेला होता.

# अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : सालाबाद प्रमाणे यंदाही अखंड हरिनाम सप्ताह समिती वासिंद विभाग वतीने अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार 30 मार्च ते शनिवार 5 एप्रिल 2025 या कालावधीत हा अखंड हरिनाम सप्ताह सोहळा पार पडत आहे. सदर सोहळयात ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण बरोबर काकड आरती, भजन, हरिपाठ तसेच नामवंत किर्तनकार व प्रवचनकार यांचे प्रवचन व कीर्तन आदी विविध धार्मिक कार्यक्रम पार पडणार आहेत. तर भागवताचार्य महाराष्ट्ररत्न ह.भ.प. आत्माराम महाराज शास्त्री



(देवाची आळंदी ) यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.

तरीही या सप्ताह सोहळयात सर्व ग्रामस्थ-नागरिकांनी सहभागी होऊन या श्रवणाचा लाभ घ्यावा असे आवाहन सप्ताह समितीचे अध्यक्ष सुनील (बाळा) सोगळे , सचिव संजय पाटील व समिती पदाधिकारी यांनी केले आहे.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024